अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । बुधवार, दि. ७ ऑगस्ट २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३०९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## बांगलादेशात हिंदूवर हल्ले; दोघांची हत्या



नवी दिल्ली : बांगलादेशमधील परिस्थिती नियंत्रणात आली नसून हिंदुवर अत्याचार झाल्याच्या अनेक घटना यावेळी समोर आल्या आहेत. अनेक हिंदू मंदिरांची तोडफोड करण्यात आली आहे. यावेळी २ हिंदू नेत्यांचा मृत्यू झाल्याचेही समोर आले आहे. बांगलादेशात अनेक ठिकाणी अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्यात आले आहे. यानंतर हजारो हिंदु नागरिकांनी भारत आणि बांग्लादेशच्या सीमेकडे धाव घेतली आहे.

बांगलादेशमध्ये सत्तापालट झाल्यानंतर देशातील अनेक हिंदु कट्टरवाद्यांच्या निशाण्यावर आहेत. बांगलादेशातील खुलना विभागातील मेहेरपूर येथे असलेल्या इस्कॉन मंदिराला कट्टरवाद्यांनी लक्ष्य केले आणि मूर्तींची मोडतोडही करण्यात केली. तसेच यावेळी मंदिराला आगदेखील लावण्यात आली.

**पाकिस्तानचा हात**

बांगलादेशमध्ये झालेल्या सत्तापालटानंतर अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. नुकतेच समोर आलेल्या एका माहितीनुसार, बांगलादेशमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण करणे आणि त्या माध्यमातून शेख हसीना यांचे सरकार पाडण्याचे कारस्थान पाकिस्तानचा हात असल्याचे समोर आले आहे.

# सरन्यायाधीश भडकले

## कोर्टात ठाकरे गटाची खरडपट्टी



नवी दिल्ली/वृत्तसंस्था

**महाराष्ट्रातील उद्धव ठाकरे यांची शिवसेना तसेच ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आमदार अपात्र प्रकरणी दाखल केलेल्या याचिकेवर मंगळवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली पण निकाल लागला नाही. ही सुनावणी पुन्हा तीन आठवड्यांनी लांबणीवर गेली. सुनावणीच्या दरम्यान सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड हे ठाकरे गटावर जाम भडकले.आमची याचिका लवकरात लवकर सुनावणीला घेण्याची मागणी करताच न्या.सरन्यायाधीशांनी ठाकरे गटाच्या वकिलांची चांगलीच खरडपट्टी केली.आमच्यावर खूप ताण आहे, तुम्हीच इथे बसा, अशी उपहासात्मक समज न्या.चंद्रचूड यांनी देताच कोर्टातील वातावर एकदम स्तब्ध झाले.**



### आमदार अपात्र प्रकरण

गेल्या अनेक दिवसांपासून शिवसेना-राष्ट्रवादी यांच्या आमदार अपात्रता प्रकरणी मंगळवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. मात्र, आधीचा खटला लांबल्याने सुनावणी होऊ शकली नाही.मात्र, सरन्यायाधीशांनी अजित पवारांसह त्यांच्या ४१ आमदारांना पुढील ३ आठवड्यात जयंत पाटील यांच्या याचिकेवर उत्तर देण्याची मुदत दिली आहे. तर शिवसेनेबाबत हे जुने प्रकरण असून एकनाथ शिंदे आणि त्यांच्या आमदारांनी कोर्टात उत्तरही सादर केले आहे. त्यामुळे शिवसेनेच्या दोन्ही बाजूच्या वकिलांना संकलन तयार करून सादर करण्यास सांगितले आहे.

शिवसेनेचे वकिलांनी हे प्रकरण लवकरात लवकर सुनावणी घेऊन निकाल द्यावा अशी इच्छा प्रकट केली. त्यावर सरन्यायाधीश संतापून मग तुम्हीच येऊन इथे बसा असे सुनावले. शिवसेनेच्या दोन्ही बाजूने संकलन दिल्यानंतर ही सुनावणी सुप्रीम कोर्टातच चालेल. सप्टेंबर किंवा ऑक्टोबरमध्ये या प्रकरणाचा निकाल लागण्याची शक्यता आहे. मंगळवारी दोन्ही प्रकरणासाठी मुहूर्त लाभला नसला तरी सप्टेंबरमध्ये तारीख येईल तेव्हा दोन्ही प्रकरणे ऐकले जातील आणि त्यावर निकाल येईल, असे वकील सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितले.

अपात्र प्रकरणात अजित पवार गटाकडून सर्वोच्च न्यायालयात उत्तर दाखल करण्यासाठी अधिकचा वेळ मागण्यात आला. अजित पवारांच्या वकिलांनी केलेली मागणी सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली. त्यामुळे या प्रकरणात तारीख पे तारीख सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. आधी शिवसेना आणि मग राष्ट्रवादीच्या आमदार प्रकरणांवर सुनावणी झाली. मागील सुनावणीवेळी न्यायालयाने अजित पवारांसह त्यांच्या ४१ आमदारांना उत्तर दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. पण या आमदारांनी अद्यापपर्यंत उत्तर दाखल केलेले नाही.

विधानसभेचा कार्यकाळ संपत आलेला आहे. निवडणुकीला अवघ्या दोन महिन्यांचा कालावधी राहिलेला असताना न्यायालयाच्या तारखा पडत आहेत. या प्रकरणाचा निकाल कधी लागणार, असा प्रश्न सामान्यांना पडला आहे.

### सरन्यायाधीश का संतापले ?

शिवसेनेच्या प्रकरणात विलंब होत असल्याने ठाकरे गटाच्या वकिलांकडून खटल्यास विलंब होत आहे. त्यामुळे तुम्ही म्हणजेच सरन्यायाधीशांनी लवकरात लवकर तारीख द्यावी, अशी आग्रही मागणी केली. त्यावर तुम्ही आमच्या इथे येऊन बसा आणि तुम्हीच ठरवा. आमच्यावर खूप ताण असतो, तुम्हाला १–२ दिवसात तारीख दिली जाईल, असे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी संतापून उत्तर दिले.

### काय आहे प्रकरण ?

शिवसेनेत फुटीनंतर आमदार अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. तर राष्ट्रवादीकडून जयंत पाटील यांनी कोर्टात याचिका दाखल केली आहे. राहुल नार्वेकर यांनी शिवसेना राष्ट्रवादीच्या दोन्ही गटातील एकाही आमदारांवर अपात्रतेची कारवाई केली नाही. एकनाथ शिंदेंसह त्यांच्या आमदारांना अपात्र ठरवले नाही. त्यामुळे ठाकरे गटाच्या सुनील प्रभू यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती आणि अजित पवारांसह आमदारांना अपात्र न केल्याने शरदचंद्र पवार पक्षाच्या जयंत पाटलांनीही सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती.

## विद्युत वाहिनीचा शॉक बसल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

### हिपळे येथील घटना

सोलापूर/प्रतिनिधी

शेतात जनावरे राखत असताना पावसाने तुटून पडलेल्या विद्युत वाहिनीचा शॉक बसल्याने ४० वर्षीय शेतकरी मरण पावले. ही दुर्घटना हिपळे (पो.शिंगडगाव, ता.दक्षिण सोलापूर) येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली.

प्रकाश आनंदा वाघमोडे (वय ४० रा. हिपळे (ता.दक्षिण सोलापूर) असे मयत झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. ते मंगळवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास स्वतःच्या शेतात राखत असताना पाण्याची मोटर चालू करण्यासाठी गेले होते.



मयत प्रकाश वाघमोडे

त्यावेळी पावसात तुटून पडलेल्या विद्युत वाहिनीचा स्पर्श पायाला लागल्याने ते खाली कोसळून बेशुद्ध झाले होते. त्यांना हुच्चप्पा (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले.

मयत प्रकाश वाघमोडे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, आई आणि दोन भाऊ असा परिवार आहे. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## देव कार्यात पत्नीला उचलून का नाचला म्हणून नागोबाचीवाडी येथे दिराचा चाकूने भोसकून खून

### भावजयला पोलीस कोठडी

सोलापूर/प्रतिनिधी



देवकार्यात पत्नीला उचलून घेऊन नाचल्याच्या कारणावरून दिराचा चाकूने भोसकून खून करण्यात आला. ही घटना नागोबाचीवाडी (ता.बार्शी) येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात बार्शी तालुक्याच्या पोलिसांनी मयताच्या भावजयला अटक केली. तिला ५ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याच्या आदेश बार्शीच्या न्यायालयाने दिला आहे. धनराज काळे असे खून झालेल्या इसमाचे नाव आहे.

या संदर्भात मयताची पत्नी संगीता धनराज काळे वय २७ रा.नागोबाचीवाडी) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी फिर्यादीची जाऊ आशा एजिनाथ काळे (वय ३३, रा. नागोबाचीवाडी) हिला अटक करून पोलीस कोठडी घेतली. आरोपी आशा काळे हिचा पती एजिनाथ याचा काही दिवसांपूर्वी मृत्यू झाला होता. त्यामुळे ती मयत धनराज काळे (दीर) यांच्या घरी राहण्यास होती. त्यांच्या घरात देवदेवचा कार्यक्रम होता त्यावेळी धनराज काळे हा त्याची पत्नी संगीता तिला उचलून घेऊन नाचला होता . त्यामुळे आशा काळे हिला राग आला होता . त्या कारणावरून तिघात रविवारी सायंकाळी भांडण झाले होते. तेंव्हा आशा काळे हिने घरातील चाकूने सपासप वार केल्याने धनराज हिरा काळे (वय ३०, रा. नागोबाचीवाडी) हा गंभीर जखमी होऊन मरण पावला. असे संगीता काळे यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास फौजदार भालेराव करीत आहेत.

## आंदोलनामुळे राज ठाकरेंनी धाराशिवचा दौरा आटोपला

धाराशिव : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्रात आरक्षणाची गरज नाही, असे विधान केले. त्यामुळे सोमवारी ठाकरे यांच्या धाराशिव दौऱ्यावेळी मराठा आरक्षण आंदोलकांनी राज ठाकरे यांच्या विरोधात जवळपास साडेतीन तास आंदोलन केले. आंदोलनामुळे मंगळवारी सकाळी मनसेचे ठाकरे यांनी धाराशिव दौरा आटोपता घेतला.

राज ठाकरे हे धाराशिव जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघाच्या बैठका केवळ तासभरातच त्यांनी उरकल्या. त्यानंतर दोन दिवसाचा धाराशिव जिल्हा दौरा संपवून लातूरकडे रवाना झाले. यावेळी थांबलेल्या हॉटेल परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ठाकरे यांनी या ठिकाणी बोलावलेली नियोजित पत्रकार परिषद देखील रद्द केली. सोमवारपासून राज ठाकरे यांच्या मराठवाड्यातील दौऱ्याची सुरुवात धाराशिवमधून केली. यावेळी मराठा आरक्षणावर भूमिका स्पष्ट करा, असा आग्रह करत मराठा आरक्षण आंदोलकांनी हॉटेलमध्ये प्रवेश करीत जवळपास साडेतीन तास आंदोलन केले.

त्या हॉटेलमध्ये घुसून आंदोलकांनी घोषणाबाजी केली. त्यानंतर मंगळवारी राज ठाकरे यांनी दुसऱ्या दिवशीचा धाराशिव दौरा आटोपता घेतला.

## विष प्राशन केलेल्या विवाहित तरुणीचा मृत्यू

सोलापूर/प्रतिनिधी

पती-पत्नीच्या भांडणात रागाच्या भरात कीटकनाशक प्राशन केलेली रूपाली कल्लप्पा सितारे (वय २० रा.माशाळवस्ती, बहुरूपी नगर) ही विवाहिता उपचारादरम्यान सोमवारी सायंकाळी मयत झाली.


३१ जुलै रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास तिने राहत्या घरात कीटकनाशक प्राशन केली होती. तिला रवी (मामा) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते . उपचारादरम्यान ती मयत झाली. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

## उजनीमधून विसर्ग कमी, दोन दिवसात पूर ओसरणार

पंढरपूर/प्रतिनिधी

गेले चार दिवस उजनी आणि वीर धरणातून सोडण्यात येत असलेल्या पाण्यामुळे भीमा नदीकाठी पूरस्थिती निर्माण झाली होती. मात्र नदीकाठच्या लोकांना आता दिलासादायक बातमी आहे. कारण उजनी आणि वीर या दोन्ही धरणातून येणारा विसर्ग कमी करण्यात आला आहे.

दौंडमधून उजनी धरणात येणारा विसर्ग मंगळवारी एकदम घटला आहे. सायंकाळी सहाच्या माहितीनुसार दौंडमधून ३२ हजार क्युसेकचा विसर्ग धरणात येवून




मिसळत होता. सोमवारी हा विसर्ग दोन लाखांपर्यंत होता. पुणे जिल्ह्यात पाऊस थांबला आहे तसेच तेथील धरणांमधून विसर्गही कमी करण्यात आला आहे.त्यामुळे सोमवारी रात्री दहा वाजल्यापासून दौंडमधून धरणात येणारा लोंढा एकदम कमी झाला,असे उजनी धरण व्यवस्थापनाच्या सूत्राने सांगितले. मंगळवारी उजनी धरणातून भीमा नदीतील विसर्ग कमी झाला आहे. मंगळवारी ८० हजार क्युसेकचा विसर्ग नदीत सोडण्यात आला.सोमवारी सुमारे सव्वा लाखापेक्षा अधिक विसर्ग धरणातून नदीत सोडला गेला होता.त्यामुळे भीमा नदीकाठी पूर परिस्थिती निर्माण झाली होती. दौंड आणि उजनीतून भीमा नदीतील विसर्ग कमी झाल्याने पूर ओसरणार आहे. आता भीमा नदीची पाण्याची पातळी कमी होणार असून पाण्याखाली गेलेले अनेक बंधारे मोकळे होणार आहेत.

- **नदीपात्रातील पाणी बाहेर येण्याची शक्यता**
- **नदीकाठच्या व्यासनारायण झोपडपट्टी व अंबाबाई पटांगण झोपडपट्टी येथील कुटुंबांचे स्थलांतर**
- **चंद्रभागेला आलेल्या पुरामुळे पंढरपूर येथील नदीपात्रातील पुंडलिक मंदिर पाण्यात, तर इतर लहान मंदिरे पाण्याखाली बुडाली**

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



काल मी शेवटची 'रील्स' बनवली!


कल्याण

150-67-188

मुंबई

256-30-136


# योग्य वेळ आल्यावर निवडणूक लढवण्याबाबत जाहीर करू

## ▸▸प्रशांत परिचारक यांचे सूतोवाच ▸▸कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आवाहन

मंगळवेढा/प्रतिनिधी

**मागील विधानसभा निवडणुकीसारखे यंदाच्या निवडणुकीत कार्यकर्त्याला कोणाच्याही दावणीला बांधले जाणार नाही. जी चूक गेल्या वेळी ती चूक यंदा होणार नाही, योग्य वेळ आल्यावर निवडणूक लढवण्याबाबत जाहीर करू असे म्हणत माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पदाधिकाऱ्यांना विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागण्याचे आवाहन केले आहे.**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परिचारक गटाच्या निवडक कार्यकर्त्यांचा स्नेह मेळावा मंगळवेढा तालुक्यातील कागष्ट येथे पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी दामाजी कारखान्याचे अध्यक्ष शिवानंद पाटील, अजित जगताप, युन्नुश शेख, भारत पाटील, शिवाजी नागणे, राजाराम जगताप, हरीभाऊ यादव, रणजीत जगताप, पिंटू गवळी, सचिन चौगुले, माधवानंद आकळे, श्रीकांत गणपाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



**मंगळवेढा : मंगळवेढ्यात परिचारक गटाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. त्यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मेळाव्याला संबोधित केले.**

माजी आमदार परिचारक म्हणाले, योग्य वेळ आल्यावर योग्य निर्णय घेवून निवडणूक लढवण्याबाबत जाहीर करू त्यासाठी कार्यकर्त्यांनी तयार राहावे. मागील तीन वर्षांत कार्यकर्त्याला जो त्रास झाला, तो त्रास मलाही झाला. ती चूक मला मान्य आहे. त्यामुळे या पुढील काळात तसा त्रास होणार नाही. कार्यकर्त्यांनी बुथ वाईज कामाला लागावे. कार्यकर्ता बळकट असेल तरच आपणाला विधानसभा निवडणुकीत यश येऊ शकेल.

यावेळी हरी यादव, भारत पाटील, पिंटू गवळी, शिवाजी नागणे, राजाराम जगताप, रणजीत जगताप यांनी परिचारक गटाला आलेल्या अडचणी कथन केल्या.

### परिचारकांवर निवडणूक लढवण्याचा दबाव वाढला

माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यावर निवडणूक लढवण्याचा दबाव वाढत आहे. प्रत्येक कार्यकर्त्यांना त्यांना कोणत्याही परिस्थिती निवडणूक लढा असेच सांगत आहे. दामाजीचे अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी ज्या पक्षाची लाट आहे, त्या पक्षाची उमेदवारी घ्यावी, असे आवाहन केले. माजी नगरसेवक अजित जगतापांनी, विधानसभा निवडणुकीत लोकांचा कल बघून निर्णय घ्यावा, असे सूचित केले.